MHAH080001452014

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १९९/१९९५</u>**
**<u>मधील अर्ज (नि.३१४) वरील आदेश</u>**

*(लक्ष्मण रभाजी वाघ*
***विरुध्द***
*रंगनाथ रभाजी वाघ व इतर)*

**<u>(दिनांक २४/०९/२०२५ रोजी)</u>**

सदरचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी यांचे असे कथन आहे की, वादीने सदरचा दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. दाव्याचा निकाल लागल्यानंतर वादीने हुकूमनामा बजावणीसाठी रे.द.नं. १५६/२००२ दाखल केली. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी रे.अ.नं. १७/२००२ हे दाखल केले व अपिलामध्ये स्टे घेतल्यानंतर न्यायालयाच्या हुकूमाचा अपमान करुन बेकायदेशिर फेरफार नं. ८६७, १०२४, १०२९ तयार करुन त्याआधारे मिळकतीचे हस्तांतरण केले.

**०३.** वादी यांचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीचे ७/१२ चे उतारे काढले असता असे दिसून येते की, दावा रिमांड झाल्यानंतर प्रतिवादी क्र. २ गोपीनाथ (मयत) याने प्रतिवादी क्र. ३ व त्यांच्या मुलांना काही क्षेत्र विक्री केले आहे. त्यामध्ये गट क्र. १०३/१ मधील ०.४० आर क्षेत्र (फेरफार क्र. २६२२) हे क्षेत्र प्रतिवादी क्र. ३ चा मुलगा महेंन्द्र (प्रतिवादी क्र. ३-५) यास विक्री केले आहे. तसेच याच गटातील ०.३० आर क्षेत्र प्रतिवादी क्र. ३ चा मुलगा केशव रामजी (मयत) यास विक्री केलेले आहे. सदरचे क्षेत्र ७/१२ ला रोहिदास केशव वाघ याच्या नावावर आहे.

तसेच प्रतिवादी क्र. ३ याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर करिता पंचायत समिती संगमनेर तर्फे ग्रामसेवक पळसखेडे, दिपक चंदु तायडे यांना ०.०१७० आर हे क्षेत्र बक्षिसपत्राने दिलेले दिसते. त्यामुळे वादीस दावा दुरुस्त करावा लागत आहे.

**०४.** वादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ मयत बाबासाहेब रंगनाथ वाघ याच्या वारसांनी गट क्र. १९७ (स.नं.६०९) ही वादीच्या आई सुंदराबाई वाघ यांच्या नावावर असणारी जमिन ही प्रतिवादी क्र. १ब चा मुलगा सुनिल सोपान कांडेकर याला विक्री केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ने जे क्षेत्र प्रतिवादी क्र. ३ ला विक्री केलेले आहे तेही वाटपात त्याच्या हिश्याला टाकणे गरजेचे आहे. प्रतिवादीने केलेले हस्तांतरण हे दावा रिमांड झाल्यानंतर आणि दाव्यात मनाई हुकूम असताना केलेले आहे. प्रतिवादींच्या या हरकतीमुळे वादीचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे वादीला दरम्यानचा दावा मिळकतीच्या उत्पन्नाचा हिशोब होवुन मिळाला पाहिजे त्यासाठी दाव्यात दुरुस्ती होणे आवश्यक आहे, त्यामुळे वादी यांनी खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहेः

**प्रतिवादीपणात ५ च्या पुढे ६ आकडा लिहून त्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर करिता पंचायत समिती, संगमनेर तर्फे ग्रामसेवक पळसखेडे, दिपक चंदु तायडे वय वर्ष ४५ कामधंदा नोकरी, रा. पारेगाव, ता. संगमनेर. तसेच ६ च्या पुढे प्रतिवादी क्र. ७ सुनिल सोपान कांडेकर, वय वर्ष ४०, कामधंदा. नोकरी व रा. पळसखेडे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर. तसेच ७ च्या पुढे प्रतिवादी क्र. ८ म्हणुन कैलास**

**विठ्ठल कांडेकर याचे नाव लिहीण्यात यावे.**

**०५.** दावा कलम ८ च्या पुढे ८क असे नमुद करुन खालील प्रमाणे दुरुस्ती करण्याची व लिहिण्याची परवानगी मागितली आहेः

**दावा रिमांड झाल्यानंतर व दाव्यात वादीला मनाई हुकूम मिळाल्यानंतर प्र. वादी नं. २ याने व त्याच्या मुलांनी गट नं. १०३/१ मध्ये क्षेत्र ०.४० आर + ०.३० आर हे क्षेत्र व ०.०१७० हे.आर. हे क्षेत्र जे विक्री केलेले आहे ते क्षेत्र प्रतिवादी क्र. २ च्या हिश्याला वाटपाच्या वेळेस धरण्यात यावे व त्याच्या हिश्यातुन ते कमी करावे. तसेच (मयत) प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांनी दाव्यातील गट नं. १९७ मधील (सर्वे नं.६०९) ०.२८ आर खराबा ०.०४०० आर याची विक्री प्रतिवादी क्र. ७ व ८ यांना केलेली आहे. सदरचे क्षेत्र हे दाव्याच्या वाटपाच्या वेळेस प्रतिवादी क्र. १ च्या हिश्यास धरण्यात यावे. तसेच प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ३ ला जे विक्री केलेले क्षेत्र आहे दावा लिज पेन्डसीचा असल्याने सदरचे व्यवहार हे वादींवर बंधनकारक नाही. वादीचा दावा मिळकतीतील हिस्सा हा प्रतिवादी क्र. १ ते ४ व त्यांच्या वारसांच्या ताब्यात असल्याने ते त्याच्यातुन लाखोंचे उत्पन्न काढुन त्याचा उपभोग घेत आहेत त्याकरीता दाव्यातील दावा मिळकतीचा उत्पन्नाचा हिशोब व्हावा व तो वादीला द्यावा.**

**सदर दाव्यातील प्रतिवादीपणात सामिल केलेल्या प्रतिवादी क्र. ७ ते ८ यांच्याकडे कोणतीही मागणी नसुन केवळ ७/१२ ला त्यांची नावे असल्याने त्यांना दाव्यात समाविष्ट केले आहे.**

**दाव्याच्या विनंती कलमांमध्ये "उ" या अक्षराच्या पुढे "ए" हे अक्षर टाकण्यात यावे व त्यामध्ये पुढील मजकुर टाकण्यास परवानगी द्यावी.**

**प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी विक्री केलेले क्षेत्र हे त्या प्रत्येक प्रतिवादीच्या हिश्याला धरण्यात यावे व वाटपाचे वेळेस त्या प्रतिवादींच्या हिश्यातुन तेवढे क्षेत्र कमी करावे. तसेच, "ए" च्या पुढे" ऐ" हे अक्षर टाकण्यात यावे व त्यामध्ये वादीला दावा मिळकतीतील त्याच्या हिश्याचे उत्पन्नाचा हिशोब व्हावा व तो वादीला प्रतिवादींकडून देण्याचा आदेश व्हावा.**

**०६.** वादीतर्फे असे कथन करण्यात आले आहे की, सदरची दुरुस्ती ही प्रतिवादींच्या हरकतीमुळे करावी लागत आहे. त्यामुळे कोर्टाचा अवमान होऊन कोर्टाची दिशाभुल प्रतिवादी क्र. १ ते ३ चे वारस करत आहेत. दाव्यातील मनाई हुकूमाचा आदेश असतानाही दाव्यातील जमिनींचे प्रतिवादींनी जे हस्तांतरण केले आहे त्यामुळे दावा दुरुस्त करावा लागत आहे. सदरच्या दुरुस्तीमध्ये दाव्याच्या नैसर्गिक स्वरुपात कोणताच बदल होणार नाही. त्यामुळे सदर दाव्याचे दुरुस्तीचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०७.** प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांनी **निशाणी ३१७** वर सदर अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज व त्यातील मजकूर प्रतिवादीस कबूल नाही. रे.अ.नं. १७/२००२ मधील निकालाने रे.मु.नं. १९९/१९९५ चा मूळ निकाल रद्द झाला असुन दावा रिमांड झाला आहे. त्यानुसार रिमांड हा स्पेसीफिक कारणासाठी झाला असून त्यात प्रतिवादी क्र. ४ कडे मृत्युपत्राने आलेली मिळकत ही वाटपास पात्र आहे अगर नाही व वडिलोपार्जीत मिळकतीत वाटप झाले अगर नाही याकामी प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांना म्हणणे मांडणे व पुरावा देणेस संधी देऊन निकाल द्यावा असे डायरेक्शन देण्यात आले आहे. प्रकरण रिमांड

झालेनंतर प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांनी कैफियत व कागदपत्रे दाखल करुन मुद्दे निघाल्यानंतर दि. ११/०८/२०१४ रोजी पुराव्याचे शपथपत्र दिले. त्यानंतर दि. ०३/११/२०१४ रोजी प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी उलटतपास घेतला तर वादीने दि. ११/११/२०१४ रोजी उलटतपास झालेनंतर तो अर्धवट थांबवून वादी हे या ना त्या कारणाने मुदत घेत आहेत व वेगवेगळे अर्ज देत आहे. वादी केवळ वेळोवेळी दाव्यात दुरुस्त्या करुन मागतात व मुळ दावा मात्र चालवित नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज मालाफाईड आहे.

**०८.** दावा दुरुस्तीचे अर्जात मिळकत विक्रीच्या तारखा नाही. प्रतिवादींचे आपसातील हस्तांतरण हे कौटूंबिक सोईसाठी झालेले असुन सन १९९५ पासुन वादीचे दुराग्रहामूळे मिळकती स्टॅण्डस्टील राहू शकत नाही. कुटूंबाच्या अडचणी आवश्यकता या वादीचे दाव्यामूळे थांबू शकत नाही. ३० वर्षात अनेक प्रश्न उभे राहतात. वस्तुस्थितीत वादीचे वाट्याचे क्षेत्र वादीचे कब्जात आहे. ग.नं. १०३ पाटालगत असुन पाटाचे दक्षिणेकडील पुर्वेचे क्षेत्र हे वादीचा छोटा मुलगा गोरक्ष लक्ष्मण वाघ व त्याची पत्नी साखराबाई लक्ष्मण वाघ हे करीत आहेत, तसेच ग.नं. १५७/१ वादीचा मोठा मुलगा अनिल लक्ष्मण वाघ व बाळासाहेब लक्ष्मण वाघ, लक्ष्मण रभाजी वाघ हेच करतात तसेच त्यांनी विहीर बागायत केलेली असुन सदरचे क्षेत्र हे वादीचेच ताब्यात आहे. अशा प्रकारे वादीकडे त्याचे हिश्याचे ७॥ एकर क्षेत्र आहे. वाटपानंतर गट क्र. ७२० पैकी रामजीने २७/०३/१९८५ रोजी त्याचा हिस्सा विक्री केला त्यास वादी लक्ष्मण यांनी संमती म्हणुन सही केलेली आहे.

**०९.** प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांचेकडे असलेले गट नंबर १५६, १९७ व ५४६ हे सुंदराबाई कडुन मृत्युपत्राने आलेले क्षेत्र आहे व

वडिलार्जीत क्षेत्र गट नंबर ६३ पैकी ३३ आर एवढे असुन, गट क्र. ५४६ हे क्षेत्रमोबदल्यात देऊन गट नंबर ६० चे क्षेत्र घेतले आहे. तसेच गट क्र. ६० मध्ये प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांनी विहीर व ३० आर क्षेत्रावर शेततळे केलेले आहे. गट क्र. १५६ मध्ये विहीर खोदुन त्यातुन ९ हजार फुट पी. व्ही. सी. सायफन करुन गट क्र. ६० मध्ये पाणी नेलेले आहे. तसेच गट क्र. ६० मध्ये प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांनी ३ हजार क्वेअर फुटाचे नविन घराचे बांधकाम केलेले आहे. तसेच गट क्र. ६३ मध्ये सुध्दा पाईपलाईनेने प्रतिवादी क्र. ४अ ते ४ड यांनी पाणी नेलेले आहे. वरील सर्व वस्तुस्थिती वादीस माहित असुन केवळ प्रतिवादीकडील सुंदरबाईचे मृत्युपत्रातुन प्रतिवादीचे वडिलांकडे आलेल्या मिळकतीत हक्क सांगणेचे हेतूने वडिलांचे मानसिक आजाराचा फायदा घेऊन काही क्षेत्र मिळवता येते का, हा दाव्याचा एकमेव उद्देश असल्याने वादीचा दुरुस्तीचा अर्ज बेकायदेशीर व प्रकरण लांबवून प्रतिवादींना त्रास देणेचे उद्देशाने केलेला असल्याने वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज रद्द करावा अशी विनंती केली आहे.

**१०.** प्रतिवादी क्र. ३ चे वारसांनी **निशाणी ३१८** वर सदर अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज कायदेशिर, तरतुदी विरुध्द असल्याने टेनेबल नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. वादी ज्यांना दाव्यामध्ये सामिल करु पाहत आहेत त्यांना ग्रामपंचायत कायद्यानुसार नोटीस दिल्याशिवाय दाव्यामध्ये सामिल करता येणार नाही. प्रतिवादी क्र. ३ यांनी हस्तांतरण कधी केले याची तारीख, वार व वेळ अर्जामध्ये नमुद नाही. सदरचा अर्ज व्हेग स्वरुपाचा आहे. गट क्र. ५२० ही मिळकत वाटपानंतर विकतांना वादीने सदर खरेदीखताच्या व्यवहारास संमती दिलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये

सर्व वस्तुस्थिती लपवुन व्हेग व बनावट स्वरुपाचा अर्ज दिला आहे. प्रतिवादी क्र. १ कडुन वाटपानंतर प्रतिवादी क्र. ३ याने काही मिळकत खरेदी केलेली असल्याने ती मिळकत प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांच्या स्वतंत्र मालकीची असल्याने त्यासंबंधी दुरुस्ती वादीस मागता येणार नाही. सदरचा अर्ज मुदतीमध्ये नाही. तसेच, वादीच्या अर्जातील इतर संपुर्ण मजकुर खोटा व बनावट आहे. सबब, वादीचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

**११.** प्रतिवादी क्र. १अ ते १ड यांचे वारसांनी **निशाणी ३१९** वर सदर अर्जास म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीचे अर्जामधील संपूर्ण मजकुर खोटा बनावट व लबाडीचा असून तो प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. वादीने अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ मयत बाबासाहेब रंगनाथ वाघ यांच्या वारसांनी गट क्र. १९७ ही वादीची आई सुंदराबाई वाघ यांच्या नावावर असणारी जमीन प्रतिवादी क्र. १ब चा मुलगा सुनिल सोपान कांडेकर याला विक्री केली आहे. हा मजकुर खोटा, बनावट व लबाडीचा आहे.

**१२.** गट नं. १९७ हा सुंदराबाई यांच्या विक्री करण्यापूर्वी कधीही नव्हता. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ब सुनिल सोपान कांडेकर याला विक्री करण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच सदरची मिळकत गट नं. १९७ हे सुनिल सोपान कांडेकर व कैलास विठ्ठल कांडेकर यांना प्रतिवादी क्र. ४ब यांनी विक्री केलेले असून सदरचे क्षेत्र वाटपानंतर त्यांच्या हिश्यात टाकणे गरजेचे असताना वादीने सदरचे क्षेत्र दाव्याच्या वाटपाच्या वेळेस प्रतिवादी क्र. १ यांच्या हिश्यात करण्यात यावे असे चुकीचे कथन केले आहे. सदर

मिळकतीशी १अ ते १ड यांचा काहीही संबंध नाही. सदरचे क्षेत्र प्रतिवादी क्र. ४ब यांनी विक्री केलेले असल्यामुळे वाटपानंतर ते प्रतिवादी क्र. ४ब यांच्या हिश्यात टाकण्यात यावे. वादीने दावा मिळकतीचे उत्पन्नाबाबत खोटे कथन केले असून ते प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. दावा मिळकतीपैकी गट क्र. १५७/१ चे क्षेत्र २ हे ०.०१ आर खराबा ०.१५ आर, गट क्र. १०३ चे क्षेत्र १ हे वादी व त्यांची मुले अनिल लक्ष्मण वाघ व बाळासाहेब लक्ष्मण वाघ, गोरक्ष लक्ष्मण वाघ यांच्या कब्जे वहीवाटीला सूरवातीपासूनच आहे. त्यामुळे त्यांना स्वतंत्र उत्पन्न देण्याचा काही एक संबंध नाही. वादीने दाव्यात सुरुवातीपासूनच खोटे कथन केलेले असून वेळोवेळी मिळकत कब्जात नाही असे कथन करून न्यायालयाची दिशाभूल करीत आहे. वादीचा सदरचा अर्ज या कारणासाठी रद्द होणेस पात्र आहे.

**१३.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीने सदर दावा दाखल करतांना फक्त प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द दाखल केला होता व सदर मुळ दाव्याचा निकाला झाल्यानंतर त्याविरुध्द रे.अ.नं. १७/२००२ दाखल झाल्यानंतर त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांनी Cross Objection दाखल केले. सदर रे.अ.नं. १७/२००२ मधील निकालाचे अवलोकन केले असता सदर निकालानुसार रे.मु.नं.१९९/१९९५ मध्ये दि. २१/०१/२००२ मध्ये न्यायनिर्णय व हुकुमनामा पारित होतांना प्रतिवादी क्र. ४ हा मतिमंद असल्यामुळे त्याचे दाव्यातील हितसंबंध योग्य रितीने न जोपासता त्याच्या वतीने योग्य वादमित्राची नियुक्ती न होता त्याच्या हितसंबंधाविरुध्द आदेश पारित झाल्याबाबत हरकत नोंदविल्यामुळे तसेच, सदर दाव्यातील निकालामध्ये दाव्यातील एकमेकांशी संबंधित वादकथनाबाबत निष्कर्ष नमुद असतील आणि सदर एकमेकांशी संबंधित

असलेले वादकथन वेगेळे करुन Cross Objection संयुक्तिकरित्या स्वतंत्रपणे निर्णित करणे शक्य नसल्यास सदर Cross Objection दाव्यातील संपुर्ण वाद पुन्हा सुरु करत असेल तर तशा Cross Objection च्या निर्णयासाठी पुर्ण दावा दाव्यातील संपुर्ण वादासह पुन्हा न्यायनिर्णयासाठी पाठविणे (Remand Back) आवश्यक असल्याचे नमुद करुन सदर दावा पुन्हा सुनावणीसाठी रिमांड झाल्याचे दिसुन येते.

**१४.** अशा परिस्थितीमध्ये दावा पुन्हा फैलावर आल्यानंतर दाव्यामध्ये दावा मिळकतीबाबत वेळोवेळी हस्तांतरण झाल्याने वादीने त्याबाबत दावा दुरुस्तीची मागणी केली आहे. याठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **Amit Kumar Shaw & Anr vs Farida Khatoon & Anr, AIR 2005 SUPREME COURT 2209** या न्यायनिवाड्यामधील केलेल्या निरिक्षणावरुन खालील प्रमाणे मार्गदर्शन मिळते.

> "In Amit Kumar Shaw and another vs. Farida Khatoon and another, apex Court held that, application under Order XXII Rule 10 of CPC, can be made to appellate Court even though devolution of interest occurred, when case was pending in trial Court. It further held that, under Order XXII, Rule 10 of CPC, no detailed inquiry at stage of granting leave is contemplated. Court has only to be prima facie satisfied for exercising its discretion in granting leave for continuing suit by or against person on whom interest has devolved by assignment or devolution. Question about existence and validity of assignment or devolution can be considered at final hearing of proceedings. An alienee pendente lite is bound by final decree that may be passed in suit. Such an alienee can be brought on record both under this Rule as also under Order 1 Rule 10. Since, under doctrine of lis

pendence, a decree passed in suit during pendency of which a transfer is made binds transferee, his application to be brought on record should ordinarily be allowed. Doctrine of lis pendence applies only where lis is pending before a Court. Further, pending the suit, transferee is not entitled as of right to be made a party to suit, though Court has discretion to make him a party. But transferee pendente lite can be added as a proper party, if his interest in subject matter of suit is substantial and not just peripheral."

१५. तसेच, **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी श्रीमती शैला बाला दासी विरुध्द निर्मला सुंदरी दासी AIR 1958 SC 394** या न्यायानिवाड्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायानिवाडे संदर्भित करुन खालील प्रमाणे मार्गदर्शन केले आहेः

"The effect of failure to seek leave or bring on record the person upon whom the interest has devolved during the pendency of the suit was subject matter of consideration before this Court in various decisions. In the case of Sm.Saila Bala Dassi v. Sm. Nirmala Sundari Dassi and another AIR 1958 Supreme Court 394, T.L.Venkatarama Aiyar, J. speaking for himself and on behalf of S.R.Das, C.J. and A.K.Sarkar and Vivian Bose, JJ. laid down the law that if a suit is pending when the transfer in favour of a party was made, that would not affect the result when no application had been made to be brought on the record in the original court during the pendency of the suit."

१६. मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या वरील नमुद न्यायनिवाड्यामध्ये असे निरिक्षण नोंदविले आहे की, दावा प्रलंबित असतांना दावा मिळकतीतील हितसंबंध हस्तांतरीत झाले असले तरीही ज्या त्रयस्थ व्यक्तीस दावा मिळकतीतील हितसंबंध हस्तांतरीत झाले ती व्यक्ती दाव्याच्या

अंतिम हुकुमनाम्यास बांधील असते. तसेच, प्रलंबित वाद तत्वाच्या सिद्धांतानुसार दाव्यातील हुकुमनामा हस्तांतरणकर्त्याला देखील बंधनकारक असतो. त्यामुळे अशी व्यक्ती जिला दावा मिळकतीतील हितसंबंध दावा प्रलंबित असतांना हस्तांतरीत झाला असेल तिला दाव्यामध्ये पक्षकार करता येते. परंतु, तशा पक्षकारास दाव्यात सामिल न केल्यास दाव्यातील हुकुमनाम्यावर कोणताही परिणाम होत नाही. अशावेळी न्यायालय सदर व्यक्तीस पक्षकार म्हणुन सामिल करावे किंवा नाही याबाबत, दावा दिर्घकाळ प्रलंबित असल्याचे लक्षात घेऊन सदर हितसंबंधाचा हस्तांतरीती (Transferee of interest) व्यक्तीस दाव्यात पक्षकार म्हणुन सामिल केल्यास दाव्याच्या अंतिम निकालास विलंब होऊ शकतो या कारणास्तव सदर हस्तांतरीती वर दाव्याचा अंतिम हुकुमनामा बंधनकारक असल्याने व दावा लवकरात लवकर निकाली होणे आवश्यक असल्याने सदर व्यक्तीस पक्षकार सामिल न करता दाव्याचा अंतिम निकाल करण्यासाठी त्या व्यक्तीस पक्षकार म्हणुन सामिल करण्याची परवानगी न्यायालयास असलेले दुरदर्शित्व (Discretion) चा अवलंब करुन नाकारु शकते.

**१७.** सबब, सदर दावा सन १९९५ पासुन प्रलंबित असुन यापुर्वी झालेल्या निकालाविरुध्द अपिलात Cross Objection च्या स्वरुपाने काही नवीन तत्थ्ये (Facts) समोर आल्याने सदर दावा पुन्हा नव्याने सुनावणीसाठी सन २०१२ पासुन प्रलंबित असल्याचे लक्षात घेऊन वादीच्या विनंतीप्रमाणे हस्तांतरीती (Transferee of interest) यांना पक्षकार म्हणुन सामिल करण्याची परवानगी नाकारण्यात येते. परंतु, अर्जातील दावा कलम ८क तसेच, दावा कलम 'ए आणि ऐ' मधील मजकुर हा दाव्यातील नंतर झालेल्या घडामोडीबाबत असुन सदर मजकुर

दाव्यातील अंतिम वाद संपुष्टात येण्यासाठी आवश्यक असुन सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. परंतु, ८क मधील मजकुर की, "**सदर दाव्यातील प्रतिवादीपणात सामिल केलेल्या प्रतिवादी क्र. ७ ते ८ यांच्याकडे कोणतीही मागणी नसुन केवळ ७/१२ ला त्यांची नावे असल्याने त्यांना दाव्यात समाविष्ट केले आहे.**" हा मजकुर अनावश्यक असल्याने कलम ८क मधील मागणी केलेल्या मजकुरापैकी सदर मजकुर वगळुन कलम ८क मधील इतर मजकुर तसेच, कलम ए व ऐ मधील मजकुराबाबत दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते. सबब, खालीलप्रमाणे आदेश करीत आहेः

| **–आदेश–** | |
|---|---|
| **१.** | अर्ज (**नि.३१४**) खर्चासह अशंतः मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | वादी यांनी खर्च रक्कम रु. १,०००/– तालुका विधी सेवा समिती, संगमनेर यांना द्यावी. |
| **३.** | वादी यांनी नोंद घेवून तात्काळ आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत विनाविलंब दाखल करावी. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2025.09.24 18:03:07 +0530

संगमनेर.
दिनांकः– २४/०९/२०२५.

**(श्रीमती एस. बी. ढवळे.)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
संगमनेर.